# स्तव तुझा करू द्यावा...

स्तव तुझा करू द्यावा
हे सुखाच्या उगमा
वर्णयाला सुचवावा
तुझा कृपा महिमा

१.दूत जैसी वर्णिताती
तुझी कीर्ती गौरवी
मला तैसी देव प्रीती
वंदायाला शिकवी

२.मज भ्रष्टा पाहुनिया
प्रभू ख्रिस्त शोधिले
तारणाला योजुनिया
रुधीराला ओतिले